जानकर व वेळापूर पोलीस स्टेशनतर्फे मुस्लीम बांधवांना इफ्तार पार्टी

वेळापूर : वेळापूर (तालुका माळशिरस) येथील सुन्नी शाही मदिना मस्जिद येथे मुस्लिम बांधवांचा सध्या पवित्र रमजान महिना सुरू आहे रमजान सणानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर आणि वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्यावतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने रोजा सोडण्यासाठी मुस्लिम बांधवांना फळांचे वाटप करण्यात आले तर उत्तमराव जानकर यांच्या वतीने मस्जिद मधील सर्व मुस्लिम बांधवांना स्नेहभोजन देण्यात आले.यावेळीउत्तमराव जानकर व वेळापुर पोलिस स्टेशन यांच्यावतिने मुस्लिम बांधवांना रमजान सणाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी मुस्लिम सुंन्नी जमात वेळापूर शहराध्यक्ष खुदबुद्दीन कोरबू यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर व वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव, उपनिरीक्षक अल्ताफ काझी यांचा सत्कार करण्यात आला तसेच मुस्लिम सुंन्नी जमात वेळापूर संघटनेचे सचिव व माजी उपसरपंच जावेद मुलाणी यांच्या हस्ते उपस्थित सर्व मान्यवर ,पोलीस कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. इफ्तार पार्टीच्या कार्यक्रमाला मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब वाडगे, संदीप तात्या माने देशमुख, संजय देशपांडे ,निवृत्ती भुसारे, विनायक माने, शिवाजी मोहिते, अमोल पनासे तसेच वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस कर्मचारी सोहेल तांबोळी, नितीन लिंगडे, यशवंत आनंदपुरे, विठ्ठल बंदुके, विजय देशपांडे, राजरतन कांबळे, विपुल कांबळे, हर्षल ठाकूर, नाना पाटकुलकर, अंकुश काळे यांच्यासह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशोक कोरे यांना आदर्श लिपिक पुरस्कार

अक्कलकोट : येथील सी. बी. खेडगी महाविद्यालयातील कनिष्ठ लिपिक अशोक कोरे यांना हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था (कराड) च्यावतीने आदर्श लिपिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा कराड येथील शताब्दी सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी खासदार राजू शेट्टी हे होते. यावेळी व्यासपीठावर हुतात्मा सहकारी दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष गौरव नायकवडी, कार्याध्यक्ष संजय अहिर,रत्नागिरी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष उदय बने, कराडचे तहसीलदार विजय पवार,मुख्याधिकारी कपिल जगताप, डॉ. संजय भागवत, सुनील सावंत उपस्थित होते. प्रास्ताविक भाषण हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था (कराड) चे अध्यक्ष डॉ. सुनील फडतरे यांनी केले. अक्कलकोटचे अशोक कोरे सह राज्यामधील विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम केलेल्या गुणी जणांना स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आले. अशोक कोरे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, सचिव सुभाष धरणे, व्हाइस चेअरमन अशोक हारकुड, संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. शिवराय आडवीतोट, उपप्राचार्य बसवराज चडचण, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले.

श्री स्वामी समर्थ विसावा मंदिरात धार्मिक कार्यक्रम

अक्कलकोट : अक्कलकोट-सोलापूर रस्त्यावरील श्री स्वामी समर्थ विसावा मंदिरात श्री च्या १४५ वा पुण्यतिथी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. श्री स्वामी समर्थ महाराजाच्या १४५ वा पुण्यतिथी निमित्त सकाळी ६ ते ८ श्री ना अभीषेक, ८ ते ११ पारायण, भजन, ११ ते दुपारी १ भजन आरती कार्यक्रमा नंतर दिवसभर भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. विधिवत पूजा नुरंदर स्वामी यांनी केले. सर्वत्र भगवा पताका लावण्यात आले होते. यामुळे भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. दहिटणे, कोन्हाळी येथील भजनी मंडळ यांनी सहभाग दर्शविली.सदर कार्यक्रम परम पूज्य राजेंद्र सुरवसे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. पुण्यतिथी सोहळ्यात प्रकाश क्षीरसागर, नागनाथ जाधव, कूर्पेद्र जगताप, भीमाशंकर सुरवसे, भालचंद्र कदम, नागनाथ कदम, जगदीप जाधव, सुहास पाटील, नागनाथ जाधव, रोहित यादव, सूर्यकांत माळगे, हेमलता देशमुख, उषा गोगावकर, अर्चना सुरवसे, शुभांगी सुरवसे, लक्ष्मी शिंदे आदी हजारो भाविकांनी उपस्थित दर्शवून विविध धार्मिक कार्यक्रमात सहभाग दाखवून श्री चे दर्शनाचा लाभ घेतला. या पवित्र ठिकाणी मैंदर्गी येथील स्वामी समर्थ महाराज यांचे मूळ पादुका असून रोज शेकडो भाविक नित्याने दर्शन घेत असतात. पुण्यतिथी निमित्त कोल्हापूर, पुणे, करमाळा, सातारा, सांगली, सोलापूर, फलटण, विशेष करुन पश्चिम महाराष्ट्रातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून विनयभंग ; तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्याकडे वारंवार वाईट नजरेने बघून मानसिक त्रास देत तिच्या मनात लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी तरुणाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाणे पुन्हा दाखल करण्यात आला आहे.वैभव आप्पासाहेब बागळे (वय-२०, रा.सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना दि.१७ एप्रिल रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान सोलापुरात घडली. घटनेचा पुढील तपास मपोसई काळे या करीत आहेत.

सुराज्य सोलापूर
Classified
विवाहविषयक
वधु २६, ५.३, गोरी, १० वी, हिंदु लिंगायत, वडील नाहीत. आई-मुलीचा केटरींग व्यवसाय, शेती ४ एकर, मुलीकरीता सर्वजातीय सामान्य वर चालेल.
मो.7028536999
8446068427
(240423)

मोटारसायकल, मोबाईल, लॅपटॉप चोरी करणाऱ्या तीन आरोपींना अटक

तीन लाखांचा मुद्देमाल जप्त; गुन्हे शाखेची कामगिरी

सुराज्य/सोलापूर

चोरून झुडुपात ठेवलेल्या दुचाकींसह ११ गाड्यांसह चोरीतील दोन लॅपटॉप, ५ मोबाईल असे एकूण जवळपास तीन लाखाचा मुद्देमाल गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त डॉ.दीपाली काळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

चोरी केलेले दोन लॉपटॉप येऊन एक आरोपी कर्णिक नगर येथे थांबलेला असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या सपोनि संजय क्षीरसागर यांच्या पथकाला मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी उमेश नागनाथ भोसले (वय-२५, रा.भगवान नगर झोपडपट्टी) याला ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केल्यानंतर त्याने ७ मोटारसायकल व दोन लॅपटॉप आणि ५ मोबाईल चोरल्याचे कबूल केले.पोलिसांनी त्याच्याकडून वरील एकूण २ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. तुळजापूर नाका येथे एक संशयित इसम तीन दुचाकींसह थांबल्याची माहिती सपोनि श्रीनाथ महाडीक यांना मिळाली.या माहितीवरून पोलिसांनी प्रशांत यल्लप्पा शिवशरण (वय-२६, रा. रुपाभवानी मंदीराजवळ) याला ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केल्यानंतर त्याने तीन दुचाकी चोरल्याचे कबूल केले. दरम्यान, त्याच्याकडून सदर बाझार पोलिस ठाणे हद्दीतील २ आणि वळसंग हद्दीतील चोरी झालेली एक दुचाकी पोलिसांनी जप्त केली आहे. तर मार्केट यार्ड परिसरात एका संशयित इसमाचा पाठलाग करून त्याला सपोनि जीवन निरगुडे यांनी पकडले. त्याच्या जवळून जोडभावी हद्दीत चोरी झालेली एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे. वैजनाथ शाहू कोळेकर (वय १९, रा. जय मल्हार नगर बाळे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ही कामगिरी पोलिस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, उपायुक्त दीपाली काळे, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रांजली सोनवणे, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संजय क्षीरसागर, जीवन निरगूडे, श्रीनाथ महाडीक यांच्या पथकातील महेश शिंदे, राजू मुदगल, कृष्णात कोळी, कुमार शेळके, वाजिद पटेल, संतोष मोरे, बर्डे, संजय साळुखे, अंकुश भोसले, अनिल जाधव, शैलेश बुगड, राजकुमार वायमारे, धायगुडे, सतीश काटे, बाळू काळे यांनी केली.

पैसे दुप्पट करून देतो असे म्हणून महिलेची २४ लाखांची फसवणूक

सांगोला : पैसे डबल देतो म्हणून एकाने सुमारे २४ लाख ३४ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सांगोला पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माधुरी अशोक खाडे (रा.समर्थ मंगल कार्यालयाचे पाठीमागे, सांगोला) यांनी पोलीसात संतोष जनार्दन शिंदे (रा. वासूद) याच्या विरोधात फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांचे सांगोला शहरातील वासूद रोड येथे किराणा दुकान होते , कोरोनानंतर सदरचे दुकान बंद केले. दुकान चालवत असातना संतोष शिंदे याच्या सोबत फिर्यादी यांची ओळख झाली होती. संतोष जनार्दन शिंदे याने त्याच्या स्वताचे एस.एस.फायनान्स आहे, असे सांगितले होते. त्यावेळी फिर्यादी यांनी एस.एस.फायनान्समधून सन २०१८ साली १० हजार रुपये घेतलेले होते. ते पैसे फिर्यादी यांनी वेळेत फेडले होते त्यानंतर संतोष शिंदे हा फिर्यादीस म्हणाला की, तुमची पैशाची अडचण असेल तर माझेकडे पैसे गुंतवा मी तुम्हाला पैसे डबल करुन देतो. म्हणून फिर्यादी यांनी दिनांक ५ ऑगस्ट २०१९ ते २५ जानेवारी २०२१ या कालावधीत रोख व चेकद्वारे तसेच किराणा दुकानातील व्यवहारातील असे एकूण २५ लाख रुपये दिले होते. त्यापैकी सुमारे ६६ हजार रुपये संतोष शिंदे याने फिर्यादी यांना परत दिले.

परंतु उर्वरित रक्कम २४ लाख ३४ हजार रुपयांची फिर्यादी यांनी वेळोवेळी मागणी केली असता, वेगवेगळी कारणे देऊन पैसे देण्यास टाळाटाळ केली. तसेच संतोष शिंदे याने फिर्यादी यांना त्याच्या नावाचे चेक दिले होते. सदरचे चेक फिर्यादी यांनी बँकेत टाकले होते, परंतु खात्यात अपुरी रक्कम असल्याने सदर चेक न वटता परत आले.त्यामुळे संतोष शिंदे याने विश्वासात घेवून सदर रक्कम परत न देता फसवणूक केली असे फिर्यादीत म्हंटले आहे.

चोरट्याने तरुणीचे दोन मोबाईलसह रक्कम पळवली

सुराज्य/सोलापूर

अज्ञात चोरट्याने तरुणीचे दोन मोबाईलसह रोख रक्कम चोरून नेल्याची घटना दि.१८ मार्च रोजी चाटे गल्ली मंगळवार पेठ येथील साधना मॅचिंग ब्लाऊज दुकानासमोर घडली.

याप्रकरणी कावेरी गुडव्या स्वामी (वय-२२, रा.मुपो. आचलेर) हिने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.तिच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या नकळतपणे दोन मोबाईल, रोख रक्कम आणि बॅग असा एकूण दहा हजार पाचशे रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

२८ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीभोवती घाणीचे साम्राज्य

सुराज्य/सांगोला

सांगोला शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेंतर्गत २८ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या मानेगाव येथील मुख्य टँकच्या सभोवतालच्या तार कम्पाउंडची अत्यंत दुरवस्था झाली आहे. तर मुख्य टैकसह परिसरात काटेरी झुडपे वाढलेली आहेत

रात्री-अपरात्री कर्मचाऱ्यांना मुक्कामी चालणे मुश्किल झाले आहे. मानेगाव मुख्य टेकच्या दुरवस्थेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारीच अबाबदार असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सांगोला तालुक्यातील ८२ गावांसाठी वरदायिनी असलेल्या शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेंतर्गत मानेगाव येथे मुख्य टैंक आहे. येथून मानेगावसह कोळा हातीद जुनोनी, सोनंद डोंगरगाव,जवळा यासह २८ गावांना पाणीपुरवठा केला जातो. ग्रामीण पाणीपुरवठा अधिकारी ग्रामपंचायतीने सुरुवातीला सर्व काही सुरळीत चालले होते, परंतु कालांतराने कम्पाउंडच्या तारा तुटत गेल्या पंप हाउसच्या शटरची दुरवस्था झाली. मुख्य टॅकसह परिसराला काटेरी झाल्याचे दिसून येत आहे. गेली दोन-तीन वर्षे ग्रामपंचायतीच्या मागणीअभावी योजना बंदच होती. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे अशा कामांसाठी निधीची तरतूद होत नाही. आता नवीन कामे चालू आहेत त्यातून मानेगाव मुख्य टेकच्या दुरुस्ती देखभालीची कामेनिधीची तरतूद होत नाही. आता नवीन कामे चालू आहेत त्यातून मानेगाव मुख्य टेकच्या दुरुस्ती देखभालीची कामे पूर्ण केली जातील.

त्यामुळे मानेगाव मुख्य टैंक परिसराच्या दुरवस्थेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या भागात झुडपांनी वेढले. पंप हाउसच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना सुरक्षितता म्हणून काहीच उपाययोजना नाहीत त्यामुळे मानेगाव मुख्य टैंक परिसराची अत्यंत दुरावस्था झाली आहे.

कासार समाजाच्यावतीने कालिका देवी उत्सव

सुराज्य/पंढरपूर

येथील सो.क्ष. कासार समाजाच्या वतीने श्री.कालीका देवी उत्सव मोठ्या थाटामाटात पार पडला. एक दिवस समाजासाठी' या आवाहनास प्रचंड प्रतिसाद देऊन पंढरपूर मधील सर्व समाज बांधव, भगिनी व ज्येष्ठ समाज बांधव उपस्थित राहून श्रींचा उत्सव यशस्वीरित्या साजरा केला. प्रथम श्री.कालीका मातेची महापूजा करण्यात आली. त्यानंतर श्री.कालिका ढोल ताशा पथकाने सर्व मंगल मांगल्ये!' या आईच्या जयघोषांने ढोल ताशांच्या निनादात मिरवणुकीस प्रांरभ केला.

श्री.कालिकादेवी चौक पासून मिरवणूक निघाली तेथून पुढे काळा मारुती, चौफाळा, नाथ चौक, घोंगडे गल्ली व कासार गल्ली येथे ढोल-ताशाच्या तडफदार वादनाने झालेल्या मिरवणूकीने पंढरपूरकरांची मने जिंकली. अक्षय वाडेकर, हर्षल तिवाटणे, शुभम वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांचे व युवकांचे ढोल-पथक आकर्षक होते. मिरवणूकीच्या वेळी ठिकठिकाणी समाजबांधवांच्या वतीने प्रदक्षिणामार्गावर सरबत, रसना, फ्रुटी, कुल्फी व पाणी वाटप करुन आपली सेवा अर्पण केली, ढोल-ताशा पथकातील महिला, मुली, युवकांचा उत्साह मिरवणूकीच्या सुरवातीपासून मिरवणूक संपेपर्यंत कुठेही कमी झाला नाही. यामुळे सामाजिक एकीचे दर्शन घडले. ढोल ताशा पथकामुळे मिरवणूकीची शोभा वाढली. ढोलताशामुळे अवघी पंढरी दुमदुमली. श्री.कालिका मातेची भव्यदिव्य मिरवणूक सुरूवाती पासूनच समाजातील स्त्री पुरूषांची उपस्थिती लक्षणीय होती. महिला हया हिरव्या जरदारी साडीत आणि पुरुष हे पांढरे शुभ्र पेहराव मध्ये भारदस्त वाटत होते. ढोल ताशांचा पेहराव रूबाबदार होता. मिरवणूकी दरम्यान उन्हाची तमा न बाळगता सर्वजण मोठ्या उच्छाहात व आनंदात मिरवणुकीत सहभागी होत होते. मिरवणूक जसजशी पुढे जात होती तशतशी मुले, महिला, जेष्ठ नागरिक, अबाल वृध्द यांची संख्या वाढत होती. मिरवणूकीत रथ व घंटा यांचा देखील समावेश होता. महिलांचे व युवकांचे ढोल-पथक आकर्षक होते. त्यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष विजय मोहोळकर, चेअरमन अभय भिवरे, उपाध्यक्ष सुधीर सासवडे, सचिव शशिकांत वाडेकर, सहसचिव राजेंद्र झरकर व कार्यकारी मंडळातील सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडले त्यानंतर सर्व समाजबांधव भगिनींनी दुपारी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच युवक मंडळ, समाज बांधव यांनी भोजनकक्ष येथील जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली. या उत्सवाचे निमित्ताने सायंकाळी सुप्रसिध्द कर सल्लागार पवन झंवर यांचे अपने क्रोध से दोस्ती करले' या विषयावर मोटिव्हेशनल कार्यशाळा' व इचलकरंजी येथील समाजबांधव अंकुश गरगटे यांचे महाराष्ट्राच्या लोककला पिंगळा' व फनी गेम्स'चे आयोजन केले होते.

प्रशिक्षक नसल्याने जि.प.शाळेतील संगणक संच धुळखात

चिखली : संगणक प्रशिक्षण नसल्याने जि.प.शाळेतील संगणक संच सद्या स्थितीला धुळखात पडून आहेत.ज्या व्यक्तीला संगणकाचे ज्ञान नाही. ती व्यक्ती अडाणी असल्याचे समजले जाते. सध्याचे युग हे संगणक युग आहे. संगणकाशिवाय कुठल्याही प्रकारचे व्यवहार साध्य होत नाहीत. प्रत्येक क्षेत्रामध्ये संगणक हे आवश्यक झाले आहे. परंतु मोहोळ तालुक्यातील अनेक शाळांमध्ये संगणक असून देखील संगणकाचे ज्ञान देणारे शिक्षकच नसल्याने शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे.

सध्या प्राथमिक शाळेमध्ये पहिलीच्या वर्गापासून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संगणकाचे धडे कुठेतरी मिळाले पाहिजे. या उद्देशाने शासनाने जिल्हा परिषद शाळांना संगणक संच दिले आहेत . मात्र मोहोळ तालुक्यातील बऱ्याच जिल्हा परिषद शाळेमध्ये संगणकाचे प्रशिक्षण देणारे शिक्षकच नसल्याने लाखो रुपयांचे संगणक शिक्षकाअभावी धुळखात पडलेले असून, याचा कुठलाही फायदा विद्यार्थ्यांना होत नाही, ही शौकांतिका म्हणावी लागेल, विशेष म्हणजे - काही ठिकाणच्या शाळेत तर संगणक चोरीला गेल्याच्या घटना घडल्या होत्या त्याचा शोध पोलिसांनी लावून चोरीला गेलेले संगणक शाळेला परत मिळवून दिल्याचे प्रकार देखील घडले आहेत , एवढेच नव्हे तर मोहोळ तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत संगणक संच आहेत का ? तेथील शिक्षक शाळेत मुलांना संगणकाचे प्रशिक्षण देतात का ? याचा देखील शिक्षण विभागाने बारकाईने विचार केला पाहिजे , तसेच संगणक असून देखील संगणकाचे प्रशिक्षण देणारे शिक्षक नसतील किंवा शिक्षक असून देखील ते संगणकाचे ज्ञान मुलांना देत नसतील तर मुलांना संगणकाचे ज्ञान तर कसे मिळणार आणि संगणकाचे ज्ञान नाही मिळाले तर संगणक युगातून मुलं तर कशी मुक्त होणार अशी विचारणा आता मोहोळ तालुक्यातील पालक वर्गातून केली जात आहे.

सिनेस्टाईल पाठलाग करून ६३ लाखांचा गुटखा केला जप्त

मंद्रुप पोलिसांची कारवाई

दक्षिण सोलापूर : मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांच्या पथकाने गुटखा वाहतूक करणाऱ्या टेम्पोचा सिनेस्टाईलने पाठलाग करून मुद्देमालासह ६३ लाखांचा गुटखा जप्त केला. बुधवारी सायंकाळी चारच्या सुमारास बसवनगर ते टाकळीदरम्यान घटना घडली आहे.

नुकतेच जिल्ह्यातील अवैध गुटखा वाहतुकीवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस प्रमुख शिरीषकुमार सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांनी दिले होते. बुधवारी संध्याकाळी चारच्यासुमारास मंद्रुप पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रवींद्र मांजरे यांना बातमीदाराकडून माहिती मिळाली की, बसवनगर येथील बंद पडलेल्या पेट्रोल पंपाजवळ एक संशयास्पद विटकरी रंगाचा आयशर टेम्पो उभा आहे. सहायक पोलीस निरीक्षक मांजरे यांनी तत्काळ पोलीस पथक घेऊन सदर पाहिले जाऊन पाहिले असता तिथे काहीयक मिळून आले नाही. परंतु सदरचा टेम्पो हा हायवेवरच असण्याची शक्यता गृहीत धरून नांदणीमार्गे टाकळी कडे पेट्रोलिंग करत असताना सदर वर्णनाचा टेम्पो जाताना दिसला. पाठीमागे पोलीस गाडी लागलेली दिसताच टेम्पो चालकाने टेम्पो वेगाने कर्नाटक राज्यात जाण्याच्या बेतात असताना त्याला टाकळी येथे हायवेवर बुधवारी सायंकाळी पकडला. या टेम्पोमधील चालक व दुसरा इसम यांच्याकडे टेम्पोमधील मालाची चौकशी त्यांनी टेम्पोत गुटखा असल्याचे सांगितले. त्यामुळे सदर टेम्पो व त्यातील दोन इसमांना मंद्रूप पोलीस ठाणे येथे येऊन येऊन अन्न व औषध प्रशासन विभाग सोलापुर येथील अधिकारी यांना कळविले.

मंद्रूप पोलीस ठाणे येथे येऊन सदर संपूर्ण मालाची तपासणी करून फिर्याद दिल्याने मंद्रुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद अस्मिता ज टोणपे (वय ३८ वर्ष धंदा - सरकारी नोकरी सहायक आयुक्त यांचे कार्यालय, अन्न व औषध प्रशासन) यांनी दिली आहे. महादेव संभाजी परब(वय- ४२ वर्षे) व साथीदार प्रथमेश गमा कानेकर, (वय-२३ वर्षे, दोघे रा. रा. सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग) यांनी आयशर क्रमांक (केए-२२, एए-०४९२) या वाहनातून गुटखा घेऊन नियाले होते. मंद्रूप पोलिसांत गाडी मालक सादिक शैख, साठ्याचे मालक निजाम भाई यांच्याविरूद गुन्हा नोंद झाला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण शिरीषकुमार सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण, हिम्मत जाधव,उपविभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर ग्रामीण विभाग अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रुप पोलीस ठाण्याचेचे प्रभारी अधिकारी रवींद्र मांजरे, पोलीस नाईक अविनाश पाटील, पोलीस शिपाई संदीप काळे, चालक पोलीस शिपाई बालाजी नागरगोजे यांच्या पथकाने केली आहे.